नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - २६ Issue - 26 | वार - शनिवार दि. २० जून २०२६ Blow- Saturday Date 20 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ...तर शिवसेना पक्षप्रमुखपद सोडायला मी तयार

## मला नेतृत्त्वाची हाव नाही; उद्धव ठाकरेंच्या प्रस्तावाने खळबळ, शिवसेनाचा वर्धापनदिन सोहळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : माझ्या नेतृत्त्वावर होणारे आरोप तुम्हाला खरे वाटत असतील तर मी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडायला या क्षणी तयार आहे. माझ्या जागी एखाद्या सामान्य शिवसैनिकाला त्या पदावर बसवा. मला नेतृत्त्वाची कोणतीही हाव नाही. मी कोणत्याही क्षणी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडायला तयार आहे, असे वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या वर्धापन दिन सोहळ्यात केले. आज मुंबईतील षणमुखानंद सभागृहात शिवसेना ठाकरे गटाचा ६० वा वर्धापनदिन पार पडला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाचा समारोप अत्यंत नाट्यमयरितीने केला. उद्धव ठाकरे यांनी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडण्याची भाषा करताच उपस्थित शिवसैनिकांनी जागेवरुन उठून त्या प्रस्तावाला विरोध केला. उद्धव ठाकरे यांच्या या अनपेक्षित प्रस्तावामुळे आता ठाकरे गटात काही संघटनात्मक बदल होणार का, अशी चर्चा आता रंगू लागली आहे. एकनाथ शिंदे यांनी 'ऑपरेशन टायगर' राबवून दुसऱ्यांदा शिवसेना फोडून हा पक्ष खिळखिळा केला आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांची शिवसेना पक्षप्रमुखपद सोडण्याची ही खेळी ठाकरे गटाची नव्याने बांधणी करण्यात आणि पक्षात नवी जान फुंकण्याच्यादृष्टीने गेमचेंजर ठरणार का, हे आता बघावे लागेल.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या संपूर्ण भाषणात नेहमीप्रमाणे भाजप आणि शिंदे सेनेला लक्ष्य केले. तसेच शिंदे सेनेसोबत जाणाऱ्या सहा खासदारांवरही टीकास्त्र सोडले. मात्र, आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी अचानकपणे शिवसेना पक्षप्रमुख पदावरुन पायउतार होण्याची भाषा केल्याने अनेकांना धक्का बसला. मी कसा आहे, तुम्हाला माहिती आहे. माझ्यावर बोट दाखवलं तर मी एक क्षण पदावर राहत नाही, हे तुम्ही मी मुख्यमंत्रिपद सोडलं तेव्हा पाहिलं आहे. मला पदाची हाव असती तर मी विधान परिषदेत गेलो असतो. आता शिवसेना पक्षाला ६० वर्षे पूर्ण होत आहेत. मी देखील गेली १२-१३ वर्षे संघटनेचे नेतृत्व करत आहे. आता माझ्या नेतृत्त्वावर आरोप होत असतील तर मी या पदावरुन उतरायला तयार आहे. याचं उत्तर विचार करुन द्या. माझ्यावरील आरोप तुम्हाला खरे वाटत असतील तर मी पद सोडायला तयार आहे. फक्त अट एकच आहे की, ही सोन्यासारखी शिवसेना दरोडेखोर आणि गद्दारांच्या हातात जाऊन द्यायची नाही. माझ्यावर कोणी आरोप करत असेल तर त्याला उत्तर तुम्ही द्यायचं आहे. मला नेतृत्त्वाची हाव नाही. त्यामुळे मी पद सोडायला तयार आहे. बाकी मी डगमगलेलो नाही, खचलेलो नाही. अनेक संकटं आणि वादळं आली तरी मी पहाडासारखा उभा राहीन. पण ज्यावेळी मी पद सोडावं असं तुम्हाला वाटेल तेव्हा मी पद सोडल्याशिवाय राहणार नाही, असे सांगत उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाचा शेवट केला.

# मराठी भाषा प्रमाणपत्र नसल्यास १५ ऑगस्टनंतर अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांवर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व्हावा यासाठी परिवहन विभागाने धोरणात्मक व ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. १ जून ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले असून, १५ ऑगस्टनंतर प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.



परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची अधिकृत तज्ज्ञ संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या संस्थांमार्फतच चालकांना मोफत मराठी भाषा प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांच्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्रच परिवहन विभागाकडून ग्राह्य धरले जाणार आहे.

परिवहन विभागाचे सहआयुक्त रवी गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात (एमएमआर) प्रशिक्षण वर्ग मोठ्या प्रमाणावर सुरू असून यासाठी सुमारे ७१ अभ्यास केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

या मोहिमेला शैक्षणिक बळ देण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषदेचे सुमारे साडेचार हजार शिक्षक प्रशिक्षण कार्यात सहभागी झाले आहेत. तसेच सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांचे (आरटीओ) अधिकारी चालकांना आवश्यक सहकार्य करत आहेत. प्रवाशांशी संवाद साधताना भाषेची अडचण दूर करणे, सेवा अधिक दर्जेदार बनविणे आणि चालकांच्या व्यावसायिक संधी वाढविणे हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे विभागाने कळविले आहे. मराठी भाषेचे प्राथमिक ज्ञान मिळाल्याने प्रवासी व चालक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होणार असून दैनंदिन व्यवहार सुलभ होण्यास मदत मिळणार आहे. परिवहन विभागाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे की, १५ ऑगस्ट २०२६ नंतर अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या अमराठी चालकांवर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल. मात्र कोणावरही कारवाई करण्याचा उद्देश नसून, सर्व चालकांनी या मोफत प्रशिक्षणाचा लाभ घेऊन वेळेत प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन सहआयुक्त रवी गायकवाड यांनी केले आहे.

# दहशतवाद आणि सिंधू जल करार एकत्र शक्य नाही, भारताने पाकिस्तानला सुनावले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


नवी दिल्ली : भारताने संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेत (यूएनएचआरसी) पाकिस्तानला जोरदार फटकारले आहे. भारताने १९६० मधील सिंधू जल करार हा आजच्या काळाच्या दृष्टीने कालबाह्य आणि अप्रासंगिक ठरल्याचे स्पष्ट केले. दहशतवादाला सरकारी धोरणाप्रमाणे वापरणारा देश मैत्री आणि सहकार्याचे फायदे मिळण्याची अपेक्षा करू शकत नाही, असे भारताने ठामपणे सांगितले.

संयुक्त राष्ट्रांमधील भारताच्या प्रथम सचिव अनुपमा सिंह यांनी पाकिस्तानच्या आरोपांना सडेतोड प्रत्युत्तर दिले. त्यांनी सांगितले की, सिंधू जल कराराबाबत भारताची भूमिका पूर्णपणे स्पष्ट आहे. एका बाजूला पाकिस्तान दहशतवादाची निर्यात करत असताना, दुसऱ्या बाजूला सद्भावनेवर आधारित कराराचा लाभ घेण्याची अपेक्षा करणे तर्काच्या पलीकडचे आहे. त्यांनी अधोरेखित केले की, १९६० मध्ये झालेला हा करार आता कालबाह्य झाला आहे. जग वेगाने बदलत आहे आणि कोणतीही तांत्रिक व्यवस्था काळानुसार स्थिर राहू शकत नाही. सहा दशकांपूर्वी झालेल्या या कराराला आजच्या वास्तवापासून वेगळे ठेवता येणार नाही.भारताने पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचाही उल्लेख केला. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर पाकिस्तानकडून होणारा सीमापार दहशतवाद पूर्णपणे थांबेपर्यंत भारताने सिंधू जल करार स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, पाकिस्तानची सुमारे ८० टक्के शेती आणि ९३ टक्के पाण्याच्या गरजा सिंधू नदी प्रणालीवर अवलंबून आहेत. प्रथम सचिव अनुपमा सिंह यांनी पाकिस्तानला आपल्या अंतर्गत समस्यांकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला. भारतीय प्रदेशांकडे लक्ष देण्याऐवजी पाकिस्तानने स्वतःच्या घरातील परिस्थिती सुधारावी, असे त्यांनी म्हटले. त्यांनी पाकिस्तानला फ्रँकेन्स्टाईन राष्ट्र असे संबोधले.

## आदेश कमाल ९० दिवस किंवा पुढील आदेशापर्यंत लागू राहणार

# इंधन साठेबाजी रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून उपाययोजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक ग्राहकांनी किरकोळ पेट्रोल पंपांवरून पेट्रोल-डिझेल खरेदी न करता घाऊक ग्राहकांसाठी असलेल्या इंधन केंद्रांमधूनच इंधन खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच कोणत्याही ग्राहकाला एका वाहनासाठी प्रतिदिन २०० लिटरपेक्षा अधिक डिझेल विक्री करता येणार नाही. या इंधनाची पुनर्विक्री करण्यासही मनाई करण्यात आली आहे. तेल विपणन कंपन्या आणि किरकोळ विक्री केंद्र चालकांनी या निर्बंधांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असून हा आदेश कमाल ९० दिवस किंवा पुढील आदेशापर्यंत लागू राहणार आहे. जागतिक भू-राजकीय घडामोडींमुळे ऊर्जा पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याने देशातील पेट्रोलियम उत्पादनांच्या उपलब्धतेवर ताण निर्माण झाला आहे. काही ठिकाणी औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक ग्राहकांकडून किरकोळ पेट्रोल पंपांवरून मोठ्या प्रमाणात पेट्रोल व डिझेल खरेदी होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने ११ जून २०२६ रोजी मोटर स्पिरिट आणि उच्च गती डिझेल (किरकोळ विक्री केंद्रांमार्फत पुरवठ्याचे अस्थायी विनियमन) आदेश, २०२६ जारी करून इंधन विक्रीवर तात्पुरते निर्बंध लागू केले आहेत. राज्य शासनानेही १२ जून २०२६ रोजीच्या आदेशाद्वारे या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. यापूर्वी राज्य शासनाने ५ जून २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे पेट्रोलियम उत्पादनांची साठेबाजी, काळाबाजार, किरकोळ विक्री केंद्रांमधून टँकर किंवा बाउजरमध्ये अनधिकृत इंधन भरणे, इंधनात भेसळ, गळती, अनधिकृत हस्तांतरण, जादा दर आकारणी; तसेच निकृष्ट दर्जाचे इंधन पुरवठा यांसारख्या गैरप्रकारांवर कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, नियंत्रक शिधावाटप, संचालक नागरी पुरवठा, उपायुक्त पुरवठा, जिल्हा पुरवठा अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच पोलीस उपअधीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेले सर्व पोलीस अधिकारी यांना कारवाईचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

राज्य शासनाने सर्व संबंधित यंत्रणांना इंधन साठेबाजी, काळाबाजार व इतर गैरप्रकारांवर कठोर नजर ठेवून दोषींविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.



## संपादकीय....

# आभाळाकडे डोळे

पावसाच्या प्रतीक्षेने नागरिक आभाळाकडे डोळे लावून बसले आहेत. अनेक शहरांमध्ये पाणीटंचाईच्या समस्याही सुरू झाल्या आहेत. यापूर्वीच्या अंदाजातील सर्व तारखा उलटल्यानंतर हवामान विभागाने मान्सूनसाठी पुन्हा एकदा नवीन तारीख दिली आहे. नैऋत्य मोसमी पावसाच्या प्रगतीला महाराष्ट्रात २३ जून रोजी सुरूवात होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या शुक्रवारच्या अंदाजात त्यांनी याबद्दल माहिती दिली. पण महाराष्ट्रातील कोणत्या भागातून पावसाची वाटचाल सुरू होईल हे अजून अस्पष्ट आहे. भारतीय हवामान विभागातील तज्ज्ञ सुदीप कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण महाराष्ट्रात २२ जूनपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. जुलैमधील स्थितीबद्दल आता अंदाज व्यक्त करता येणार नाही. जुलै आणि ऑगस्टच्या अंदाजाबद्दल माहिती जुनअखेरीस जाहीर होईल. तसेच, पुण्यात येत्या काही दिवसांत हवामान फारसं बदलणार नाही. तीन-चार दिवसांमध्ये पावसाची शक्यता नाही. गेल्या १२ दिवसांपासून महाराष्ट्रात मान्सूनचा प्रवास रखडला आहे. दरम्यान, पुण्यात मान्सूनच्या आगमनाला १० दिवस उशीर झाला आहे. महाराष्ट्रासह तेलंगण, ओडिशा, झारखंड, बिहार आणि छत्तीसगढमधील काही भागांमध्येही मान्सूनचा वेग २३ जूनपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. मराठवाड्याचे खरिपाचे ४९ लाख हेक्टर क्षेत्र असून आतापर्यंत १० हजार हेक्टरवर पेरणी झाली आहे. सिंचनाची व्यवस्था असलेल्या भागात पिके तग धरून आहेत. पावसाची दडी कायम असल्यामुळे पेरण्या रखडल्या आहेत. तर २२ जूननंतर विभागात वादळासह हलक्या स्वरूपात पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे. 'एल निनो'च्या प्रभावामुळे मोसमी पावसात अडथळे निर्माण झाले आहेत. राज्यभरात पाऊस झाला नसल्यामुळे खरीपाच्या पेरण्या रखडलेल्या आहेत. यंदा मराठवाड्यात ४८ लाख हेक्टरवर पेरण्या प्रस्तावित आहेत. मात्र, आतापर्यंत केवळ दहा हजार हेक्टरवर पेरणी झाली आहे. त्यात कापूस पिकाची सर्वाधिक ५२९४ हेक्टरवर लागवड झाली आहे. सिंचनाची व्यवस्था असलेल्या शेतकऱ्यांनी लागवड केली आहे. या पाण्यावर पिके तग धरून आहेत. मात्र, सिंचनाची सुविधा नसलेल्या शेतकऱ्यांना पाऊस पडण्याची प्रतीक्षा आहे. सोयाबीन, तूर, मका, बाजरी, मूग या पिकांची पेरणी रखडलेली आहे. जिल्ह्यात सहा लाख ९७ हजार हेक्टरवर पेरणी प्रस्तावित असून, आतापर्यंत केवळ ८१८ हेक्टरवर पेरणी झाली आहे. जालना जिल्ह्यात १८८० आणि बीड जिल्ह्यात तीन हजार ५०२ हेक्टरवर पेरणी झाली आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत २२ जूननंतर पाऊस सक्रिय होण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केला आहे.

# शिवसेना वर्धापन दिन अन् पक्षनिष्ठ कार्यकर्ते....

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिवसेनेच्या साठाव्या वर्धापनदिनी हा लेख लिहिताना बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसैनिक म्हणून मनाला खूप वेदना होत आहेत पण जी वस्तुस्थिती समोर दिसत आहे ती लिहावीच लागेल कारण ते सर्व महाराष्ट्राला माहित आहे ! आणि मी त्यावर पडदा टाकू म्हटलं तरी मी तो टाकू शकत नाही !

एक तर तू राहशील नाहीतर मी राहीन !

सूड हवा आहे मला ... सूड!

असे म्हणतात की... कधी कधी आपण जे बोलतो ते ऐकून नियती तथास्तु म्हणते! आणि ते आपल्या स्वतःच्याच वाट्याला येते ! उद्धव ठाकरे आज याच प्रत्यक्ष अनुभव घेत आहेत!

२०१९ ला जनतेने शिवसेना भाजपच्या बाजूने कौल दिला होता ! काँग्रेस राष्ट्रवादीला बाहेर ठेवा असा जनतेचा कौल होता ! परंतु हा कौल फाट्यावर मारत , बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचाराला गुंडाळून ठेवत , मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरेंनी जनमत आणि भाजपशी गद्दारी केली ! इथपर्यंत सुद्धा ठीक होते ! परंतु मुख्यमंत्री झाल्यावर नम्रतेने सरकार चालवून जनहिताची कामे करायला पाहिजे होती ! पण जनतेने काय पाहिले, त्यांना काय दिसले.....?




१ ) कंगना राणावत हिचे घर तोडणे, २ )केतकी चितळे हिला केवळ एक पोस्ट फॉरवर्ड केली म्हणून ४२ दिवस जेलमधे घातले ! ३) नवनीत राणा हनुमान चालिसा मातोश्री समोर म्हणते असे म्हणाली म्हणून तिच्यावर गुन्हा दाखल करून तिला १४ दिवस जेलमध्ये टाकले! ४) नारायण राणे केंद्रीय मंत्री असताना सुद्धा फालतू कारण दाखवून त्यांना जेवत्या ताटावरून अटक केली ! ५) ज्येष्ठ पत्रकार अर्णव गोस्वामी यांना विनाकारण अटक केली ! ६) पालघर साधू हत्याकांड प्रकरण!

वरील सर्व प्रकरणात ठाकरे सरकारची मस्ती आणि मस्तवाल पणा संपूर्ण महाराष्ट्राला दिसून आला !

देवेंद्र फडणवीस आणि भाजप यांना आम्ही कसे सत्तेबाहेर बसवले म्हणून त्यांना रोज अपमानित केले एव्हढेच न्हवे तर खोट्या केसमध्ये त्यांना अडकवण्याचा सुद्धा प्रयत्न केला!

तुम्ही वार केल्यावर समोरची व्यक्ती सुद्धा तुमच्या वर वार करणारच! भाजपने तेच केलं! अडीच वर्षात तुमचे सरकार पाडले; तुमचा पक्ष गेला , चिन्ह गेले ! इतकेच काय, सेनेचा आत्मा असलेली मुंबई महापालिका सुद्धा तुमच्या ताब्यातून हिसकावून घेतली !

जनता सुद्धा तुमच्या (उभाठा) विरुद्ध गेली आहे हे यावरून लक्षात येते!

आणि आता ताजी गोष्ट म्हणजे तुमचे ६ खासदार फुटले ! हा सुद्धा तुमच्यावर देवेंद्र फडणवीस यांनी नाही-तर नियतीने घेतलेला बदला / सूड च आहे ! आणि अजून काय काय तुमच्या (उभाठा) वाट्याला येणार आहे हे देव-लाच ठाऊक ??

असं म्हणतात की... बायकांचा तळतळाट घेऊ नये, त्याचे परिणाम खूप भोगावे लागतात ! हे वरील घटनांवरून सिद्ध झालेच आहे! त्याशिवाय .......?? तुम्हीच बोललेले वाक्य ...

सूड हवा आहे मला ... सूड !

एक तर तू राहशील नाहीतर मी राहीन!!

हे सर्व तुमच्यावर च उलटले आहे ... नियती ने म्हटले !

तथास्तु

**– दत्ता भोसले... पंढरपूर !**

# 'द सोलापूर क्रिएटर्स अवॉर्ड'मध्ये डॉ. ज्योती वाघमारे आणि सुदक्षणा चॅटला यांच्यातील संवाद सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूरला भारताच्या इतिहासात एक अत्यंत भव्य आणि गौरवशाली वारसा लाभला आहे. आज समाजात विधायक बदल घडवून आणण्यासाठी आपण सर्वजण येथे एकत्र आलो आहोत आणि सोलापूरमध्ये तो बदल घडवून आणण्याची प्रचंड क्षमता आहे. आजच्या डिजिटल युगात केवळ प्रसिद्धीच्या मागे न धावता, आपल्या कार्यातून समाजावर एक उत्तम प्रभाव पाडण्यावर भर द्या; जेणेकरून आपल्या सोलापूरचा नावलौकिक देशपातळीवर अधिक वाढेल, असे प्रतिपादन राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी केले.

हिरेमठ फाउंडेशन आयोजित 'द सोलापूर क्रिएटर्स अवॉर्ड' अंतर्गत एका विशेष संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. 'द सॅप मीडिया'च्या संस्थापक सुदक्षणा चॅटला यांनी डॉ. ज्योती वाघमारे यांच्याशी संवाद साधला.

या वैचारिक सत्रात डॉ. वाघमारे यांनी सोशल मीडियाची रचनात्मक बाजू, क्रिएटर्सची सामाजिक जबाबदारी, महिला सक्षमीकरण आणि तरुण पिढीची भूमिका यावर अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

**'आई' ही जगातील सर्वात मोठी क्रिएटर!**

निर्मिती आणि सर्जनशीलता या संकल्पनेवर बोलताना डॉ. ज्योती वाघमारे म्हणाल्या की, या जगात जर कोणती सर्वात मोठी क्रिएटर (निर्माती) असेल, तर ती 'आई' आहे. आई एका नव्या पिढीची आणि उत्तम संस्कारांची निर्मिती करते. त्यांच्या या विधानाने उपस्थित सर्वांची मने जिंकली.

**हिरेमठ फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम; 'प्रसिद्ध होण्यापेक्षा प्रभावशाली बनून सोलापूरचा गौरव उज्ज्वल करा' – खासदार डॉ. ज्योती वाघमारे**

**तरुण हा देशाचा चेहरा; पुस्तकांशी मैत्री करा**

महिला सक्षमीकरणाचा मुद्दा मांडताना त्यांनी आजच्या प्रगतीशील युगात महिलांच्या वाढत्या कर्तृत्वाचे कौतुक केले. आजचा युवक हा भारताचा खरा चेहरा आहे, असे सांगत त्यांनी उपस्थित तरुण डिजिटल क्रिएटर्सना उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करण्याचे आवाहन केले. सोशल मीडियाच्या काळातही वैचारिक समृद्धी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी, पुस्तके हीच आपली सर्वात चांगली मित्र आहेत हा मोलाचा संदेश त्यांनी दिला. तसेच डिजिटल माध्यमांचा वापर समाज प्रबोधनासाठी आणि चांगल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

**सुदक्षणा चॅटला यांनी साधला सुसंवाद**

या सत्राचे नेटके नियोजन आणि थेट संवाद साधण्याचे काम सुदक्षणा चॅटला यांनी उत्तमरीत्या केले. सोलापूरच्या स्थानिक गुणवंतांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी हिरेमठ फाउंडेशनने घेतलेला पुढाकार आणि हे संवाद सत्र अत्यंत महत्त्वाचे ठरले.

# शालेय शिक्षण विभाग आणि गुगल दरम्यान कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षणासाठी करार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे प्रगत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि गुगल फॉर एज्युकेशन यांच्यादरम्यान उद्देशपत्रावर आज स्वाक्षरी करण्यात आली. या उपक्रमाअंतर्गत पुढील दीड वर्षांच्या कालावधीत राज्यातील चार लाखांहून अधिक शिक्षकांना 'गुगल एआय एज्युकेटर सिरीज' अंतर्गत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात गुगलच्या वतीने गुगल फॉर एज्युकेशन विभागाचे उपाध्यक्ष ख्रिस फिलिप्स, तर शालेय शिक्षण विभागाच्या वतीने सहसचिव श्री. ताशीलदार यांनी उद्देशपत्रावर स्वाक्षरी केली.

यावेळी बोलताना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांना आधुनिक कौशल्यांनी सुसज्ज करणे ही काळाची गरज आहे. या कराराअंतर्गत टप्प्याटप्प्याने शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रारंभी निवडक मास्टर ट्रेनर्सना प्रशिक्षण दिले जाईल. त्यानंतर हे प्रशिक्षित शिक्षक राज्यभरातील इतर शिक्षकांना प्रशिक्षण देतील. या माध्यमातून राज्यातील प्रत्येक शाळेपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेवरील प्रशिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या उपक्रमासाठी राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नसून संपूर्ण प्रशिक्षण गुगलमार्फत विनामूल्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. शिक्षकांच्या डिजिटल सुरक्षिततेची काळजी घेण्यात आली असून या संपूर्ण प्रक्रियेवर महाराष्ट्र शासनाचे नियंत्रण राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**राज्यातील चार लाख शिक्षकांना मिळणार लाभ**

शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले की, २१व्या शतकात शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व झपाट्याने वाढत आहे. शासकीय तसेच अनुदानित शाळांमधील शिक्षकांना जागतिक दर्जाच्या संस्थेकडून प्रशिक्षण मिळावे, अशी विभागाची अपेक्षा होती. गुगल फॉर एज्युकेशन सोबत झालेल्या या सहकार्यामुळे राज्यातील लाखो शिक्षकांना अत्याधुनिक प्रशिक्षणाचा लाभ मिळणार आहे. मास्टर ट्रेनर्सच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक शाळेपर्यंत हे प्रशिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून त्यामुळे शिक्षकांसह विद्यार्थ्यांनाही मोठा फायदा होईल. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत आवश्यक जनजागृती निर्माण होण्यासही मदत मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

या सहकार्याअंतर्गत शिक्षकांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरता वाढविणे, डिजिटल कौशल्ये विकसित करणे, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये स्थानिकीकरण केलेली प्रशिक्षण सामग्री उपलब्ध करून देणे, शिक्षकांना सुरक्षित डिजिटल आेळख प्रदान करणे तसेच आधुनिक गुगल एआय साधनांचा शैक्षणिक वापर करण्यास प्रोत्साहन देण्यात येणार आहे. याशिवाय शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला चालना देण्यात येणार आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांशी सुसंगत असलेल्या या उपक्रमामुळे तंत्रज्ञानाधारित अध्यापन पद्धतींचा प्रसार होण्यास मदत होईल. तसेच आयसीटी प्रयोगशाळा, कनेक्टेड



वर्गखोल्या, स्मार्ट वर्गखोल्या, डिजिटल ग्रंथालये आणि भाषा प्रयोगशाळा यांसारख्या डिजिटल शिक्षण सुविधांना बळकटी मिळणार आहे.कार्यक्रमास शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, सहसचिव श्री.ताशीलदार, गुगल फॉर एज्युकेशनचे वरिष्ठ अधिकारी संजय जैन, विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

# कोळसा वायूकरणामुळे भारत ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होईल; विदर्भाला गॅसिफिकेशन हब बनविणार : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कोळसा वायूकरण (कोल गॅसिफिकेशन) विकसित भारताच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. ऊर्जा क्षेत्रातील आत्मनिर्भरतेसाठी हा परिवर्तनाचा निर्णायक टप्पा आहे. केंद्र शासनाच्या धोरणांना पूरक अशी राज्याची धोरणे राबवून विदर्भाला कोळसा वायूकरण आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या उत्पादनांचे प्रमुख केंद्र बनविण्याचा राज्य शासनाचा निर्धार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हॉटेल ताज लँडस एन्ड, बांद्रा येथे केंद्रीय कोळसा मंत्रालयाने आयोजित केलेल्या 'सरफेस कोल लिग्नाइट गॅसिफिकेशन प्रमोशन रोड शो' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्री जी. किशन रेड्डी, केंद्रीय खनिकर्म राज्यमंत्री सतीशचंद्र दुबे, केंद्रीय कोळसा मंत्रालयाचे सचिव विक्रम देव दत्त, अतिरिक्त सचिव भूपिंदर ब्रार, सरोज कुमार झा



तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, गुंतवणूकदार उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोळसा वायूकरणाचा इतिहास मुंबईशी जोडलेला आहे. १८६२ मध्ये बॉम्बे गॅस कंपनीने परळ येथे कोळसा वायूकरण प्रकल्प सुरू केला होता. त्यामुळे या क्षेत्रातील देशाचा ऐतिहासिक वारसा मुंबईकडे असून, आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भारत पुन्हा या क्षेत्रात मोठी झेप घेईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'आत्म निर्भर भारत' आणि 'विकसित भारत' या संकल्पना साकार करण्यासाठी ऊर्जा क्षेत्रातील स्वावलंबन अत्यावश्यक आहे. आजही देशाला तेल, वायू आणि इतर ऊर्जा स्रोतांच्या आयातीवर दरवर्षी मोठा निधी खर्च करावा लागतो. त्यामुळे परकीय चलनावर ताण येतो, महागाई वाढते आणि जागतिक घडामोडींचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी स्वच्छ व स्वदेशी ऊर्जा निर्मितीला चालना देणे गरजेचे आहे.

भारताने २०३० पर्यत ५०० गिगावॅट स्वच्छ ऊर्जा निर्मितीचे लक्ष्य ठेवले असून, देशाने आधीच २८३ गिगावॅट क्षमतेचा टप्पा पार केला आहे. सौर, पवन आणि हरित हायड्रोजनबरोबरच कोळसा वायूकरणही ऊर्जा सुरक्षेचा महत्त्वाचा आधार ठरणार आहे. भारताकडे सुमारे ४०० अब्ज टन कोळशाचा साठा आहे. या कोळशापासून इथेनॉल, मिथेनॉल, युरिया, विविध रसायने आणि कार्बन कॅप्चर, युटिलायझेशन अँड स्टोरेज तंत्रज्ञानाद्वारे पर्यावरणपूरक औद्योगिक विकासाला चालना देता येईल. त्यामुळे प्रदूषणात घट होऊन उद्योग क्षेत्र अधिक शाश्वत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

कोळसा वायूकरण उद्योगाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने हजारो कोटी रुपयांचे प्रोत्साहन जाहीर केले आहे. महाराष्ट्र शासनानेही त्याला पूरक धोरण जाहीर केले असून, भांडवली अनुदानासह विविध सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत. विदर्भातील कोळशाचे साठे आणि विकसित होत असलेली स्टील उद्योग साखळी लक्षात घेता महाराष्ट्र हे देशातील ग्रीन स्टील आणि कोळसा वायूकरण उद्योगाचे प्रमुख केंद्र बनू शकतो, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

बीपीसीएल, कोल इंडिया, न्यू एरा क्लीनटेक, क्रेटा एनर्जी, अदानी समूहासह अनेक कंपन्यांनी राज्यात या क्षेत्रात गुंतवणुकीला सुरुवात केली असल्याची माहिती देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रकल्पांसाठी दोन हजार एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली असून, 'मैत्री' पोर्टलद्वारे सर्व परवानग्या निश्चित कालमर्यादेत देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

गुंतवणूकदारांनी या क्षेत्रात मोठ्याप्रमाणावर पुढे यावे, असे आवाहन करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, केंद्र आणि राज्य शासनाच्या धोरणांमुळे कोळसा वायूकरण क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. विदर्भाला या उद्योगाचे राष्ट्रीय केंद्र बनवून महाराष्ट्र देशाच्या औद्योगिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल,.''कोळशाला केवळ कोळसा समजू नका; योग्य तंत्रज्ञान आणि योग्य वेळ मिळाल्यास तोही कोहिनूर ठरू शकतो,'' असे सांगत विकसित भारताच्या निर्मितीत कोळसा वायूकरणाची भूमिका निर्णायक ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**विकसित भारताच्या निर्मितीला गती मिळणार – केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्री जी. किशन रेड्डी**

कोळसा वायूकरण (कोल गॅसिफिकेशन) हे भारताच्या ऊर्जा क्षेत्रातील सुधारणांचे पुढील महत्त्वाचे पर्व असून, ऊर्जा सुरक्षा, आर्थिक सुरक्षा, औद्योगिक प्रगती आणि विकसित भारताच्या निर्मितीसाठी ते निर्णायक ठरणार असल्याचे केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्री जी. किशन रेड्डी यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री रेड्डी म्हणाले की, गेल्या बारा वर्षात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने वीज आणि नूतनीकरणक्षम ऊर्जा क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तन अनुभवले आहे. त्या सुधारणांनंतर आता कोळसा वायूकरण हे ऊर्जा क्षेत्रातील पुढील मोठे परिवर्तन ठरणार आहे. कोळसा क्षेत्रात व्यापक सुधारणा करण्यात आल्या असून, त्यामुळे देशात कोळसा वायूकरणासाठी भक्कम पाया तयार झाला आहे. या क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने प्रथमच मोठ्याप्रमाणावर प्रोत्साहनपर योजना जाहीर केली आहे. या योजनेमुळे उद्योग क्षेत्रातील गुंतवणुकीला मोठी चालना मिळेल आणि देशात उत्पादनवाढीसह रोजगारनिर्मितीलाही गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयातून या क्षेत्रात मोठी गुंतवणूक आकर्षित होईल. देशाला उत्पादन क्षेत्रात जागतिक केंद्र बनविणे, आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. कोळसा वायूकरणाच्या माध्यमातून देशाच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळेल, असे केंद्रीय मंत्री रेड्डी यांनी सांगितले.

**कोळसा वायूकरणामुळे ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर भारताची वाटचाल वेगवान होईल – केंद्रीय राज्यमंत्री सतीशचंद्र दुबे**

ऊर्जा क्षेत्रातील आत्मनिर्भरता आणि औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने कोळसा व लिग्नाईट वायूकरणाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्यासाठी ३७ हजार ५०० कोटी रुपयांची ऐतिहासिक प्रोत्साहन योजना मंजूर केली असल्याची माहिती केंद्रीय कोळसा व खनिकर्म राज्यमंत्री सतीशचंद्र दुबे यांनी दिली.

केंद्रीय कोळसा व खनिकर्म राज्यमंत्री सतीशचंद्र दुबे म्हणाले की, २०३० पर्यत १०० दशलक्ष टन कोळसा वायूकरणाचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. या माध्यमातून मिथेनॉल, अमोनिया, युरिया आणि इतर रसायनांच्या आयातीवरील अवलंबित्व कमी होईल. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात या क्षेत्राला दिलेल्या पाठबळाचे कौतुक करत त्यांनी देशातील पहिला मोठा कोळसा वायूकरण प्रकल्प महाराष्ट्रात सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी वारीमध्ये वारकरी व भाविकांना उत्कृष्ट सुविधा देऊन सुरक्षेलाही प्राधान्य द्यावे : पालकमंत्री जयकुमार गोरे

## आषाढी एकादशी पालखी सोहळ्याच्या नियोजनासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून पुणे विभागीय आयुक्त कार्यालयातून आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : आषाढी यात्रा शनिवार दिनांक २५ जुलै २०२६ रोजी भरणार असून, त्यानिमित्ताने आषाढी एकादशी पालखी सोहळा शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडावा तसेच वारीमध्ये वारकरी व भाविकांना उत्कृष्ट सुविधा तसेच त्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याच्या अनुषंगाने काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.



आज रोजी पुणे विभागीय आयुक्त कार्यालय येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे पुणे, सातारा, सोलापूर व अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांचा पालखी सोहळा नियोजनाचा आढावा प्रसंगी पालकमंत्री गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, प्रांताधिकारी सचिन इथापे, विजया पांगारकर, सह आयुक्त नगरपालिका प्रशासन आशिष लोकरे, तहसीलदार पंढरपूर सचिन लंगोटे, पंढरपूर नगरपरिषद मुख्याधिकारी महेश रोकडे, कार्यकारी अभियंता भीमा विकास विभाग पंढरपूर जी. एस. कथले, सहाय्यक आयुक्त अन्न प्रशासन साहेबराव देसाई, अधीक्षक अभियंता महावितरण सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांच्या सह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की पालखी मार्गाची सुरक्षितता, रस्त्यातील अडथळे, रिंगण सोहळ्याचे ठिकाण, पालखी मुक्कामाची ठिकाणे, रस्ते व पूल दुरुस्ती अशी अन्य सर्व कामे संबंधित विभाग प्रमुखांनी स्वतः लक्ष घालून तत्परतेने पूर्ण करून घ्यावीत. पालखी मार्गावर लावण्यात येणारे फिरते शौचालय तसेच कायमस्वरूपी शौचालय स्वच्छ ठेवण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तात्पुरत्या शौचालयाजवळ चिखल राडाराडा होऊ नये, तसेच पालखी मुक्काम स्थळी योग्य त्या ठिकाणी कॉंक्रीटीकरण व मुरमीकरण दिलेल्या वेळेत पूर्ण करावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

वारकऱ्यांसाठी पिण्याचे स्वच्छ पाणी, निवाऱ्यासाठी जर्मन हॅंगर व वॉटरप्रूफ मंडप, फूट मसाज, आरोग्य सुविधा, मेडिसीन किट, स्नानगृहे, मोबाईल चार्जिंग व्हॅन, वारीतील वाहनांसाठी पुरेसे इंधन तसेच गॅस पुरवठा व इतर आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. सर्व विभागांनी हा पालखी सोहळा सर्वोत्तम म्हणून पार पाडण्यासाठी नियोजन करावे, निर्विघ्नपणे व आनंदी वातावरणात सोहळा पार पाडण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे, काही अडचणी निर्माण झाल्यास शासनास त्वरित कळवावे आणि ही जबाबदारी सेवाभाव समजून पूर्ण करावी, असेही आवाहन त्यांनी केले.

वारीदरम्यान मोबाईलसाठी पुरेसे नेटवर्क मिळण्यासाठी अधिक टॉवरची सुविधा, सीसीटीव्ही कॅमेरे, निरीक्षण टॉवर, ठिकठिकाणी ध्वनीक्षेपक, आपत्कालीन परिस्थितीत अग्निशामक दल, तसेच नदी परिसरात लाइफ जॅकेट व बोटींग सुविधा देण्याबाबतही पालकमंत्र्यांनी आढावा घेतला. जर्मन हॅंगर उभारताना खाली जमिनीची लेव्हल एकसारखी असावी, पंढरपूरच्या कॉरिडॉरच्या धरतीवर पालखी मार्गावरील व सर्व सुविधांमध्ये गुणवत्ता राखली जावी, तसेच वारीच्या काळात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये. यासाठी अत्यंत दक्ष राहून वारी यशस्वी करावी, अशा ही सूचना श्री. गोरे यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी शासन स्तरावरून करण्यात आलेल्या नियोजनाबाबत पालकमंत्र्यांना माहिती दिली. ६५ एकर, वाळवंट परिसर आणि वाखरी या ठिकाणी स्वच्छतेबाबत आवश्यक सुविधांचे नियोजन केल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हा परिषदेतर्फे करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती सादर केली. ग्रामीण भागातून पालखी पुढे गेल्यानंतर व आधी स्वच्छता करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले. जिल्हा परिषदेतर्फे पालखी मार्गावरील स्वागत कमानी, फिरते शौचालय ५०००, पाण्याचे टॅंकर २२०, तात्पुरते उपचार केंद्र १५८, बाईक म्बुलन्स १२१, मेडिसिन किट ४५०० हे दिंडी प्रमुखांना वाटप करण्यात येणार असल्याची माहितीही देण्यात आली. तसेच पशुसंवर्धन विभागामार्फत पालखीतील मानाचे घोडे व बैल यांच्यासाठी चारा व निवारा याची सोय केली जाणार असून २३ ठिकाणी जर्मन हॅंगर असतील, असेही त्यांनी सांगितले.

याशिवाय पालखी विश्वस्त ड राजेंद्र उमाप यांनी माऊलीच्या पालखीच्या वतीने वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा, तसेच मोबाईल नेटवर्क उपलब्ध करून द्यावे, आणि वाहनांना टोल माफी मिळावी अशी मागणी केली. संत तुकाराम पालखी विश्वस्त व सोपानकाका पालखी विश्वस्त यांनीही वारकऱ्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा देण्यात याव्यात, अशी मागणी केली.

---

# आमदार अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखाली, महावितरण विरोधात तहसील कार्यालयावर धडक मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील सध्या ज्वलंत प्रश्न असणाऱ्या वारंवार खंडित वीजपुरवठा मुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या हक्कासाठी शनिवार दिनांक २० जून २०२६ रोजी सकाळी दहा वाजता माढा मतदारसंघाचे आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूर तहसील कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. महावितरणच्या हुकूमशाही आणि मनमानी कारभाराविरोधात हजारो शेतकऱ्यांनी या मोर्चात सहभागी होण्याचे आव्हान आमदार अभिजीत आबा पाटील यांनी केले आहे.



सध्या शेतात उभे असलेली पिके डोळ्यादेखत जळून खाक होत आहेत तरी देखील शेतकऱ्यांच्या नदीकाठ व शेती पंपाची बीज कापली जात आहे एकीकडे निसर्गाची अवकृपा आणि दुसरीकडे महावितरणचे जाचक धोरण यामुळे शेतकरी पुरता कोरमाडला आहे वीज वितरण कंपनीने तात्काळ ही सखीची वीज तोडणी थांबवावी यासाठी येत्या २२ जून पासून मुंबई अधिवेशनात देखील ही मागणी उचलून धरणार असल्याचे माढा तालुक्याचे लोकप्रिय आमदार पाटील यांनी सांगितले .

---

# आषाढी वारी व मान्सूनच्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापनचे प्रशिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आषाढी वारी आणि येणाऱ्या मान्सून कालावधीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या सूचनेनुसार अक्कलकोट व परिसरातील पोलिस पाटील, महसूल सेवक, अग्निशमन दलाचे कर्मचारी आणि पोलिस विभागाचे कर्मचारी यांना रेस्क्यू बोट चालवणे, बचाव कार्य करणे तसेच पोहणे व बचाव तंत्र (ींशलहपळीौंश) याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांनी दिली.




या प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात आज अक्कलकोट तालुक्यात करण्यात आली. यावेळी पोलिस पाटील, महसूल सेवक आणि अग्निशमन दलाचे कर्मचारी यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षण/ कार्यशाळेसाठी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशिक्षक, तसेच बजरंग होतकर रेस्क्यू अॅकॅडमी प्रशिक्षक आणि आपदा मित्र सोलापूर हे प्रशिक्षक म्हणून सहभागी आहेत. प्रशिक्षणास सहाय्य म्हणून अरुणा राठोड आपदा सखी सोलापूर, आशा सेविका होटगी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि सागर धप्पाडुळे आपदा मित्र शुभांगी गवते आपदा सखी सोलापूर सहाय्यक प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शनात नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत पुढील टप्प्यांमध्ये अक्कलकोट तहसील व नगरपालिका, माढा तालुका व कुर्डुवाडी नगरपालिका, मोहोळ तालुका, बार्शी तालुका व बार्शी नगरपालिका, उत्तर सोलापूर तालुका, अपर मंद्रुप तहसील, करमाळा तालुका व माळशिरस तालुका या भागांतील संबंधित यंत्रणांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

---




# निफाड येथे वृक्षारोपण करून राहुल गांधी यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी - लोकसभा विरोधी पक्षनेते, कॉंग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त निफाड तालुका कॉंग्रेस कमिटी, निफाड विधानसभा युवक कॉंग्रेस व निफाड शहर कॉंग्रेस कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,

यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत तुळजाभवानी जेष्ठ नागरिक संघाच्या सहकार्याने तुळजाभवानी मंदिर उगावरोड, व प्रभाग क्र.१२ मधील रूणवाल उद्यान या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले..

समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्यदेत हा उपक्रम राबविण्यात आला. उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्पही यावेळी केला. कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, युवक कॉंग्रेसचे कार्यकर्ते तसेच महिला व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी राहुल गांधी यांच्या दीर्घायुष्याच्या व निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

निफाड तालुक्यात पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण व्हावी तसेच अधिकाधिक वृक्ष लागवड व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली.या प्रसंगी निफाड तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनायक शिंदे, व युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष सचिन खडताळे, निफाड शहराध्यक्ष स्वप्निल बिनायकिया, जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सुधाकर कापसे, जिल्हा युवक उपाध्यक्ष जयदीप कुंदे ,तालुका उपाध्यक्ष प्रभाकर हुजबंद अली भाई शेख, तालुका सरचिटणीस सुहास सुरळीकर, सेलचे तालुकाध्यक्ष संपत कराड, सुरेश गोसावी, दिलीप कुंभार्डे, शिवाजी जाधव, राजेंद्र खडताळे, देविदास धारराव, सोपान वाघ, भगवान झोंड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

### नाले व गटारे तुंबून अजूनही अर्धवट अवस्थेत

# पावसाच्या तोंडावर पडघ्यातील नाले साफ होणार का?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : मान्सून अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना पडघा ग्राम पंचायत हद्दीतील नाले आणि गटार सफाईची कामे अद्याप पूर्ण झालेली नसल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पावसापूर्वी नाल्यांची संपूर्ण साफसफाई करण्याचे आश्वासन प्रशासनाकडून वारंवार देण्यात येत असले तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी गाळ, कचरा आणि झुडपे तशीच पडून असल्याचे चित्र दिसत आहे. पडघा ग्रामपंचायत क्षेत्रातील एकूण पाच प्रभागांमध्ये नाले सफाईची कामे सुरू असली तरी अनेक भागांत कामे अर्धवट असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. नाले वेळेवर साफ न झाल्यास पावसाचे पाणी साचून पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर साचलेल्या पाण्यात डासांची मोठ्या प्रमाणावर पैदास होऊन डेंग्यू, मलेरिया आणि लेप्टोस्पायरोसिससारख्या साथीच्या आजारांचा धोका वाढू शकतो. नागरिकांच्या मते, सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने नाले व गटारांची नियमित आणि वेळेवर साफसफाई होणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र अनेक ठिकाणी अद्याप गाळ काढण्यात आलेला नसल्याने पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने युद्धपातळीवर कामे पूर्ण करून संभाव्य संकट टाळावे, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. दरम्यान, पहिल्या पावसाआधी उर्वरित सर्व नाले साफसफाईची कामे पूर्ण होणार का, याकडे पडघ्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाच्या कार्यक्षमतेची खरी परीक्षा आता पावसाळ्याच्या तोंडावर लागणार असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

> **पडघा ग्रामपंचायत हद्दीतील विविध प्रभागांमध्ये नाले साफसफाईची कामे सुरू आहेत. ज्या ठिकाणी कामे बाकी आहेत, तीही लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील. मान्सूनपूर्व सर्व आवश्यक उपाययोजना करण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासन प्रयत्नशील आहे.**
>
> **- भास्कर घुडे**
> **पडघा ग्रामपंचायत अधिकारी**



---

# मंगळवेढा तालुका ब्रह्मपुरी येथील रील स्टार रोहिणी पारधे हिला अखेर २३ दिवसानंतर पोलिसांनी दिला न्याय; पतीविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी - ब्रह्मपुरी येथील रील स्टार रोहिणी पारधे हिरा ग्रामपंचायत हॉटेलमधील काम करण्यास लावून जशी वारंवार वाद घालून भांडण करून शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने त्याच कंटाळून तिने आत्महत्या केल्याप्रकरणी पती निलेश विलास मराठी यांच्याविरुद्ध मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान तब्बल २३ दिवसानंतर पोलिसांनी या घटनेची दखल घेतल्याने रोहिणीला घराण्याने मिळाला असून हीच तिला भावपूर्ण श्रद्धांजली असल्याची प्रतिक्रिया फॉलोवर्स मधून व्यक्त होत आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या मत्त्यानुसार दिनांक २६ मे रोजी दुपारी ३.३० वाजता ब्रह्मपुरी हद्दीतील ग्रामपंचायत हॉटेलमधील रिलीज स्टार रोहिणी पारधे( वय २५ वर्ष) हिने हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली होती या घटनेनंतर सर्व सोशल मीडिया मधून आत्महत्या तिने काय केली असावी याबाबत विचारणा होत होती व पोलिसांनी तपासासाठी सी.डी. आर. काढला मात्र त्यामध्येही नेमके कारण निघाली नाही मदत रोहिणीचा पती निलेश आराधे हा मागील एका वर्षापासून तिला घरगुती कारणावरून व तिची इच्छा नसताना तिला हॉटेलमध्ये काम करण्यास लावून तिच्याशी वारंवार वाद घालून भांडणे करत होता असेच तिला अधून मधून हाताने मारहाण करत होता व तिला शारीरिक मानसिक त्रास दिल्याने मला कंटाळून तिने टोकाची पाऊल उचलत हॉटेलमध्ये राहत्या खोलीच्या दरवाजा बंद करून खोलीतील पत्र्याला असलेल्या लोखंडे अँगल ला फोडणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे त्याची



फिर्याद मुळीच रोहिणी चे वडील बाळू गिरजाप्पा शिवशरण राहणार अर्धनारी यांनी दिल्यानंतर निलेश पाराधे विरुद्ध बी एन एस १०८, ११५,(२) ३५२ ३५१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर एक करीत आहे.

# तांदूळवाडी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ४० लाखांची मदत

## आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्याने मृत्युमुखी पडलेल्या ८ व्यक्तींच्या कुटुंबीयांना मिळाला आर्थिक आधार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर / प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी माळशिरस तालुक्यातील तांदूळवाडी परिसरात पंढरपूर-सातारा मार्गावर झालेल्या भीषण अपघातात पिकअप वाहन विहिरीत कोसळून पंढरपूर तालुक्यातील एकाच कुटुंबातील आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या भीषण दुर्घटनेमुळे संपूर्ण पंढरपूर तालुक्यावर शोककळा पसरली होती.

सदर घटनेनंतर आमदार समाधान आवताडे यांनी मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन करून शासनाकडून आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अपघातग्रस्त कुटुंबीयांसाठी ४० लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे.

दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या इंदुबाई दशरथ बावचे, पूजा अमोल सातूरे, पूजा बालाजी बावचे, अश्विनी संदीप बावचे, संस्कार संदीप बावचे, संस्कृती संदीप बावचे, भारत अमोल सातूरे आणि समर्थ बालाजी बावचे यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपये याप्रमाणे एकूण ४० लाख रुपयांची आर्थिक मदत आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते देण्यात आली.

याप्रसंगी युवक नेते प्रणव परिचारक, द्रोणाचार्य हाके, नगरसेवक राहुल शिंदे नाईक, रोहित पानकर, तमीम मुजावर उपस्थित होते.


सदरची आर्थिक मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मंजूर करण्यात आली असून सोलापूर जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या मार्फत प्राप्त झालेला मदतीचा धनादेश संबंधित कुटुंबीयांना आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आले.

याबाबत आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून तातडीने मदत मिळावी यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे अवघ्या काही दिवसांतच अपघातग्रस्त कुटुंबीयांना आर्थिक दिलासा मिळाला आहे.

शासनाकडून मिळालेली ही मदत दुःख कमी करू शकत नसली तरी संकटग्रस्त कुटुंबीयांना काही प्रमाणात आधार देणारी ठरणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.



# अजीम नवाज राही यांच्या 'वळीवाच्या वेळा' कवितासंग्रहाला नांदेडचा प्रसाद बन सर्वोत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी - प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठान नांदेड तर्फे २०२४,२५ ह्या वर्षीच्या पुरस्कारांची घोषणा नुकतीच प्रतिष्ठानाचे अध्यक्ष डॉ अच्युत बन, वाङ्मय पुरस्कार समितीचे निमंत्रक डॉ सुरेश सावंत आणि संयोजक पत्रकार संजीव कुळकर्णी यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

प्रख्यात मराठी कवी, नामवंत निवेदक अजीम नवाज राही यांच्या अथर्व पब्लिकेशन जळगाव ने प्रसिद्ध केलेल्या, वळीवाच्या वेळा,, या बहुचर्चित कवितासंग्रहास प्रसाद बन सर्वोत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे.११००० अकरा हजार हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

१२ जुलै २०२६ रोजी नांदेड शहरात एका विशेष समारंभात उपरोक्त पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठान नांदेड तर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे मानकरी ज्येष्ठ संपादक,प्रसिद्ध लेखक गिरीष कुबेर, संगीता अरबुने आणि डॉ प्र दि जोशी पाटोदेकर ही दिग्गज मंडळी ठरली आहे.प्रतिष्ठानाचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे हे विशेष.

प्रसाद बन उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्काराचे मानकरी ठरलेले प्रख्यात मराठी कवी आणि श्रोताप्रिय वक्ते, निवेदक अजीम नवाज राही महाराष्ट्र राज्याच्या लेखणी आणि वाणी या दोन क्षेत्रातील महत्वाचं आणि वलयांकित नाव आहे.

व्यवहाराचा काळा घोडा,कल्लोळातला एकांत, वर्तमानाचा वतनदार, तळमळीचा तळ आणि अथर्व पब्लिकेशन जळगाव तर्फे प्रसिद्ध झालेला पुरस्कारप्राप्त ,, वळीवाच्या वेळा,, या पाच सकस कवितासंग्रहांचे ते धनी आहेत.



अजीम नवाज राही हे नाव नवनिर्मितेचे प्रयोगाशीलतेचे बलस्थान असून कुठल्याही मळक्या वाटेने न जाता स्वतःची नाममुद्रा त्यांनी वर्तमान मराठी कवितेच्या पानावर ठसठशीतपणे उमटवली आहे. अजीम नवाज राही यांच्या कवितेने परिघावरचे विश्व मराठी साहित्याच्या केंद्रस्थानी आणले. त्यांच्या कवितेतील व्यक्त होणारे दुःख सर्वसामान्यांच्या, शेतकरी, शेतमजुर, कामगारांच्या, शोषितांच्या किंबहुना अस्तित्वहीन माणसाच्या जगण्यातले आहे.

प्रतितिष्ठासंपन्न कितीतरी श्रेष्ठ पुरस्कारांचा त्यांच्या कवितासंग्रहांवर वर्षाव झाला आहे.

प्रसाद बन सर्वोत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार प्राप्त, वळीवाच्या वेळा, कवितासंग्रह समकालीन समाजमनाचं लख्ख प्रतिबिंब आहे. विद्यमान आव्हानांशी थेट भिडताना, वळीवाच्या वेळा, मधली कविता आक्रस्ताळी वा कंठाळी होत नाही. धर्म, जात, पंथाच्या तटबंदीत न अडकता सर्वधर्मीय माणसांची निखळ काळजी वाहते.वास्तवाचा, सकसतेचा, प्रयोगशीलतेचा ध्यास असलेली ही कविता भाषिकअंगाने, अनुभवाच्या अंगाने अगदी समृद्ध आहे.समग्र चिंतीत वर्तमान कवेत घेणारी आहे.

त्यांच्या कवितेतली गर्दगहिरी वस्तुनिष्ठता, घनगर्द सच्चाई, प्रतिमाशृंखलांचे अनोखे लावण्य, मातीचा सुवास लेवून आलेली भरजरी,चवदार भाषा. स्वतःची घडवलेली खास मृदगंधी शब्दकळा, ही मोठी दौलत घेऊन जगणारे, लिहिणारे अजीम नवाज राही वर्तमान पिढीतील महत्वाचे कवी आहेत. कवितागणिक, कवितासंग्रहागणिक त्यांच्या कवितेचे निराळेपण अधोरेखित झाले आहे. रेखांकित झाले आहे. मुस्लिम संस्कृती आणि या संस्कृतीबाहेरचा सर्वधर्मीय भोवताल, जीवनरितींचे बहुपदर घेऊन उभी राहिलेली त्यांची कविता मूळात मानव्याचे सुक्त गाणारी आहे.

अजीम नवाज राही यांना आजतागायत अमेरिकेतील फाउंडेशन, भारतातील केशव गोरे स्मारक ट्रस्ट मुंबईचा साहित्य प्रांतातील अत्यंत प्रतिष्ठेचा महाराष्ट्र फाउंडेशन साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वायय लेखनाचा कवी केशवसुत पुरस्कार, विदर्भ साहित्य संघाचा शरदचंद्र मुक्तीबोध, अमरावती आणि नाशिकचा नारायण सुर्वे पुरस्कार, आपटे वाचन मंदिर इचलकरंजीचा इंदिरा संत पुरस्कार, शरद पवार ग्रंथ पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, लोकमत समूहाचा लोकमत साहित्य पुरस्कार, भि ग रोहमारे पुरस्कार, शिवसेना नवरत्न पुरस्कार, शिंगणे परिवाराचा सहकारमहर्षी स्व भास्करराव शिंगणे पुरस्कार, कन्नडचा स्वातंत्र्यसेनानी, दलितमित्र भाऊसाहेब मोरे पुरस्कार, ना घ देशपांडे पुरस्कार, मराठा सेवा संघ जिजाऊ साहित्यरत्न पुरस्कार, शिक्षण महर्षी तात्याराव मोरे पुरस्कार उमरगा, कविवर्य देवानंद गोरडे पुरस्कार,मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजीनगरचा कुसुमताई देशमुख पुरस्कार,साहित्य परिषद पुणेचा भा रा तांबे पुरस्कार, लोकनेते राजारामबापू पाटील पुरस्कार इस्लामपूर,दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूरचा धम्मपाल रत्नाकर उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार इत्यादी मातब्बर पुरस्कार मिळाले आहेत.

इयत्ता १० वी ,इयत्ता ११वी व महाराष्ट्राच्या ११ विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात त्यांच्या कवितांचा समावेश असून अजीम नावज राही राज्यभर भ्रमंती करणारे श्रोताप्रिय वक्ते आणि निवेदक आहेत.

# जीएसटीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत भर : पालकमंत्री डॉ. उईके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चंद्रपूर : देशाचे प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनी १ जुलै २०१७ पासून देशात वस्तु व सेवा कर (जीएसटी) ही एकच करप्रणाली लागू केली आहे. या सुलभ कर पध्दतीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत भर पडत असून आज चंद्रपूर येथे वस्तु व सेवा कर विभागाच्या उत्तम इमारतीचे लोकार्पण होत आहे, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले.वस्तु व सेवा कर नुतन इमारतीचे लोकार्पण करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, चंद्रपूर शहराच्या महापौर संगिता खांडेकर, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे, करण देवतळे, जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, अपर राज्यकर आयुक्त विजय डांगे, राज्यकर सहआयुक्त विनोद गवई आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. वुईके म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था भक्कम होत असून आपले राज्य पुढे जात आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री उपस्थित राहणार होते, मात्र मुंबईमध्ये महत्वाच्या बैठका असल्यामुळे राज्य शासनाच्या वतीने मी आणि राज्यमंत्री शेलार येथे उपस्थित आहोत. आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या दूरदृष्टीमुळे चंद्रपूर येथे वस्तु व सेवा कर विभागाची उत्तम इमारत तयार झाली, असेही त्यांनी सांगितले.

**देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासात चंद्रपूरचे योगदान मोलाचे – वित्त राज्यमंत्री जयस्वाल**

चंद्रपूर हा उद्योग आणि वनसंपदेने नटलेला तसेच आर्थिकदृष्ट्या संपन्न जिल्हा आहे. या जिल्ह्याने नेहमीच सरकारच्या तिजोरीकरिता चांगले उत्पन्न दिले आहे. त्यामुळे देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासात चंद्रपूरचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री यांनी 'विकसित भारत – २०४७' चा रोडमॅप तयार केला असून, यात आपल्या राज्याचे महत्त्वाचे योगदान राहणार आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली हे जिल्हे आता विकासाच्या मार्गावर अग्रेसर आहेत. गडचिरोलीचे उत्पन्न पहिल्या पाच जिल्ह्यांत आणण्याचा मुख्यमंत्र्यांचा संकल्प आहे. या इमारतीचे उत्कृष्ट बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने केले असून, त्यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

**महसूल लक्षांक पूर्ततेत चंद्रपूर जिल्हा राज्यात द्वितीय क्रमांकावर**

प्रास्ताविकात राज्यकर सहआयुक्त विनोद गवई यांनी माहिती दिली की, सदर इमारत चार मजली असून या इमारतीच्या बांधकामासाठी एकूण २९ कोटी ९९ लक्ष ८० हजार रुपये खर्च झाले आहेत. ही इमारत चंद्रपूर विभागाचे मुख्यालय असून या अंतर्गत चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली हे तीन जिल्हे येतात. आर्थिक वर्ष २०२५-२६ या कालावधीत चंद्रपूर विभागाने सुमारे १४५० कोटी रुपयांचा जीएसटी महसूल गोळा केला आहे. लक्षांक पूर्ततेच्या टक्केवारीत १२२ टक्के कामगिरी करत चंद्रपूर जिल्ह्याने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

तत्पूर्वी, मान्यवरांच्या हस्ते नूतन इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. तसेच फित कापून सर्व मान्यवरांनी इमारतीची पाहणी केली. कार्यक्रमाचे संचालन दिनेश मासोदकर आणि ऐश्वर्या भालेराव यांनी केले. या सोहळ्याला राज्यकर सहआयुक्त संजय पवार, प्रशांत पाटील, संजय सायगण, सहाय्यक राज्यकर आयुक्त तेजराम मडावी, भूषण शहाणे, संतोष हेमणे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त शिवछत्रपती पुरस्कार विजेते व आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या पालकांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : दिनांक २३ जून १८९४ रोजी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीची स्थापना झाल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी २३ जून हा दिवस जगभर जागतिक ऑलिम्पिक दिन म्हणून साजरा केला जातो. खेळाडूंमध्ये क्रीडाभावना, उत्कृष्टतेचा ध्यास, सहभागाची प्रेरणा आणि निरोगी जीवनशैलीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो.

या पार्श्वभूमीवर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर व स्वामी विवेकानंद हायस्कूल, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. २३ जून २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता स्वामी विवेकानंद हायस्कूल (एमआयडीसी), सोलापूर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात जिल्ह्यातील शिवछत्रपती पुरस्कार विजेते, आंतरराष्ट्रीय खेळाडू तसेच त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात येणार असून, मान्यवरांच्या उपस्थितीत क्रीडा क्षेत्रातील अनुभवांवर आधारित चर्चासत्राचे आयोजनही करण्यात आले आहे.

तसेच जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, विविध क्रीडा संघटना, एनसीसी, मेरा युवा भारत अभियान, सामाजिक संस्था तसेच औद्योगिक प्रतिष्ठानांनी जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त विविध क्रीडा व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करावे. आयोजित उपक्रमांचा अहवाल व छायाचित्रे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास सादर करावीत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांनी केले आहे.

या कार्यक्रमास खेळाडू, पुरस्कार विजेते, पालक, क्रीडा प्रशिक्षक व क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

**आंबेडकरी चळवळी पुढे पोलीस प्रशासन हातबल**

**एका आरोपीला लवकरच अटक होणार : उपोषण आंदोलनाचा इफेक्ट**

# ...अखेर तुगाव प्रकरणातील तीन आरोपींना झाली अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गियकवाड):

आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी उपोषण आंदोलन सुरू करता क्षणी पोलीस प्रशासन खडबडून जागे झाले आणि उमरगा तालुक्यातील तुगाव येथील आंबेडकरी चळवळीतील तरुणाला जातीय द्वेश भावनेतून बेदम मारहाण करणार्या चार पैकी तीन गाव गुंड आरोपींना मुरूम पोलिसांनी अटक केली आणि एका आरोपीला लवकरच अटक करण्याचे आश्वासन दिले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की तुगाव तालुका उमरगा येथील तेथील जातीयवादी गाव गुंड रोहित दीपक जोमदे पंकज शंकर जोमदे , महेश गहिनीनाथ जोमदे व चांद अमर फकीर यांनी तुगाव येथील आंबेडकरी चळवळीतील युवा कार्यकर्ते भालचंद्र कांबळे यांचे अपहरण करून शेतात नेऊन द्राक्ष बागेच्या लोखंडी पोलास बांधून लाथा बुक्कीने व चंमड्याच्या कमरपट्ट्याने बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले.सदर निंदनीय प्रकार हा मानवतेला काळीमा फासणारा आहे. या निंदनीय घटना प्रकरणातील एका आरोपीला तात्काळ अटक करण्यात आली होती.बाकी तीन आरोपी गेल्या एक महिन्यापासून फरार होते. शेवटी आंबेडकरी चळवळतील कार्यकर्त्यांनी




अन्यायग्रस्त कुटुंबाला सोबत घेऊन उमरगा येथील प्रांत कार्यालयासमोर उपोषण आंदोलनाचा मार्ग स्वीकारला त्यामुळे हतबल झालेल्या पोलिसांना तब्बल एक महिन्यांनी त्यातील फरार तीन आरोपी पैकी दोन आरोपींना अटक करावे लागले.असे या प्रकरणातील तीन आरोपींना अटक करण्यात पोलीसाना यश आले असे म्हणण्यापेक्षा आंबेडकरी चळवळीने अटक करण्यास भाग पाडले. व एक आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल असे पोलिसांकडून ठोस आश्वासन देण्यात आले. व त्या चारही आरपी विरुद्ध अपहरणाचा गुन्हा नोंद करण्यात आला त्यामुळे उपोषणकर्त्यांनी आपले उपोषण आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे. यावेळी उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रविण स्वामी यानी उपोषणकर्त्याची भेट घेऊन मी आपल्या समवेत आहे असे ते म्हणाले.

या आंदोलनामध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे ज्येष्ठ नेते तथा जिल्हा परिषद धाराशिव चे माजी समाज कल्याण सभापती हरीश डावरे, रिपइं (आठवले) चे राज्य कार्यकारणी सदस्य एस.के. चेले आरपीआय उमरगा तालुका अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड, सामाजीक कार्यकर्ते धिरज बेळंबकर उमरगा शहर अध्यक्ष संजय उर्फ सिंघम कांबळे तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे,वंचित बहुजन आघाडीचे राम गायकवाड शाहूराज भोसले सदाशिव कांबळे सह तुगाव आणि उमरगा तालुक्यातीलआंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते महिला युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. २० जुन पर्यत महेश जामदे या आरोपीस नाही पकडल्यास उमरगा येथील पोलीस उपविभागीय आधिकारी यांच्या कार्यालया समोर हलगी निनाद अंदोलन करण्याचा इशारा अंदोलन कर्त्यानी दिला आहे.